# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१९/०९/२०१६

**१) शेतातील मोटारची चोरी . :—**

दिनांक १७+१८/०९/२०१६ रोजी चे रात्र दर. यातील फिर्यादी रामदास सदाशिव अंडेल वय ६० वर्ष रा. मांढळ हा आपल्या शेताला पाणी देण्याकरीता येलन कंपनीची मोटार ३ एचपी किंमती ८,०००/—रू. ची शेताजवळील नाल्यावर लावली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) विवाहीतेचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १८/०९/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादीला संडास बांधकामाचे कारणावरून यातील आरोपीने भांडण करून फिर्यादीचा गळा पकडुन ढकलढुकल केले व डोक्याचे केस पकडुन ओढताण करून तिचा विनयभंग केल्याने व शिविगाळ करून जिवाने मारण्यापिटण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १८/०९/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील आरोपी व फिर्यादी यांच्यात १५ दिवसा अगोदर तोंडा तोंडी भांडण झाले होते या कारणावरून फिर्यादीचे आईला शिविगाळ केली असता फिर्यादीने आरोपीस हटकले असता 'तु माझ्या आईला शिवीगाळ करतोस' या कारणावरून भांडण करून आरोपीने हातात काठी घेवुन फिर्यादीचे घरात जावुन फिर्यादीचे उजव्या पायावर व डाव्या खांदयावर काठी मारली त्यामुळे फिर्यादीचे उजवे पायावर खरचटल्या सारखी जखम झाली. असे फिर्यादी जनार्धन जिवनकाळे वय ३७ वर्ष, रा. खापरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) मारोती ओमनी गाडीची ॲक्टीवा गाडीला धडक लागुन,दोन जखमी :—**

दिनांक १८/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील जखमी आशुतोष विजय गाढवे १५ वर्ष, तारक सबिक सिध्दीकी वय १३ वर्ष रा. बेला हे ॲक्टीव्हा क्र. एमएच ३६/टिसी २३ ने नागपुर नाक्याकडुन एनएच ०६ रोडने जात असता विरूध्द दिशेने येना—या आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन ॲक्टीव्हा चालकास व त्याचे मित्रास धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २२९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान मृत्यु . :–

दिंनाक. १६/०९/२०१६ रोजी १५.१५ वा. दर. यातील मृतक शकुंतला शालीकराम आकरे वय ७० वर्ष रा. खरबी ही दि. १५/०९/२०१६ ला कोणते तरी विषारी औषध प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. १६/०९/२०१६ ला उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे पोस्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक १९/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, सिहोरा, लाखांदुर, मोहाडी व तुमसर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारू कि. १,१००/–रु. तसेच ८० मिली लिटर देशी दारू कि. ३००/–रू. तसेच जुगारातुन कि. १,४३५ /–रु. असा एकुण २,८३५/–रू. चा माल जप्त करण्यात आला

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १८/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व ईतर वाहनांवरती १२५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.